संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मुलांचे / मुलींचे वसतीगृह

दिनांक :- 26.6.2018

# वसतीगृह प्रवेश सूचना

विद्यापीठातील विविध पदव्यूत्तर विभागामध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना विद्यापीठ वसतीगृहामध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींनी Online Admisstion Form सादर करावा. **विद्यापीठाचे संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) प्रवेश अर्ज व माहीतीपुस्तिका उपलब्ध आहे.** Online प्रवेश अर्ज भरण्याची **व स्विकारण्याची दिनांक २८.६.२०१८ पासून दिनांक १२.७.२०१८ पर्यत ठेवण्यात आली आहे. सदर प्रवेश अर्जासोबत कागदपत्रे जोडुन प्रवेश अर्ज श्री चंद्रशेखर ना. लोखंडे, वसतीगृह कार्यालय, मुलींचे वसतीगृह क्र.१ यांचेकडे सदर मुदतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.** सदर मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन प्रवेशित विद्यार्थी / विद्यार्थीनींची विभाग, गुणवत्ता व वर्गवारी निहाय यादी दिनांक १८.७.२०१८ रोजी वसतीगृह कार्यालय, मुलींचे वसतीगृह क्र.१ येथे लावण्यात येईल. प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींनी माहीतीपुस्तिकेमध्ये नमुद केल्याप्रमाणे शुल्क दिनांक १९.७.२०१८ पासून दिनांक २१.७.२०१८ दुपारी ३.०० पर्यत विद्यापीठ खाती जमा करुन वसतीगृहातील प्रवेश निश्चित करावा. त्यानंतर वसतीगृहातील प्रवेशाकरीता विचार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच जे विद्यार्थी / विद्यार्थीनी मागिल वर्षी २०१७-१८ या सत्रात वसतीगृहामध्ये प्रवेशित होते आणि उन्हाळी-२०१८ चे परीक्षेमध्ये पुर्ण विषय घेवून उत्तीर्ण झाले आहेत अशा वसतीगृह प्रवेशाकरीता इच्छूक विद्यार्थी / विद्यार्थीनींनी वसतीगृह प्रवेशाकरीता Online प्रवेश अर्ज भरुन विभागात प्रवेश घेतल्यापासून तीन दिवसाचे आत किंवा दिनांक १२.७.२०१८ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यत वसतीगृह कार्यालयाकडुन प्रवेश शुल्क विवरण प्राप्त करुन विद्यापीठ खाती जमा करुन शुल्क पावती **वसतीगृह कार्यालय, मुलीचे वसतीगृह क्र.१** येथे सादर करुन आपला वसतीगृहातील प्रवेश निश्चित करावा. सदर मुदतीनंतर वसतीगृहातील प्रवेशाकरीता विचार करता येणार नाही याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे ए.टी.के.टी. च्या सवलतीने पुढील उच्च वर्गामध्ये प्रवेश मिळविलेल्या वसतीगृहातील प्रवेशित माजी विद्यार्थी / विद्यार्थीनींनी वसतीगृह प्रवेशासाठी Online प्रवेश अर्ज भरुन प्रवेश सूचना वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश अर्ज कार्यालयात सादर करावा. त्यांचा वसतीगृहातील जागा रिक्त राहील्यास विचार करण्यात येईल. तसेच दिनांक १८.७.२०१८ प्रथम प्रवेश यादीनंतर वसतीगृहातील जागा रिक्त राहील्यास रिक्त जागेवर प्रवेश देण्याबाबत वसतीगृह कार्यालयामध्ये वेळोवेळी सूचना लावण्यात येतील. ज्या विभागाचा परीक्षेचा निकाल लागलेला नाही व विभागाचे नियमित वर्ग सुरु झालेले आहे अशा वसतीगृहाचे माजी विद्यार्थी/विद्यार्थीनींना विभागामध्ये प्रवेश निश्चित होईपर्यत प्रती दिन रु.५०/- प्रमाणे विभागाचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर वसतीगृहामध्ये प्रवेश होईपर्यत रु.१०/- वसतीगृहामध्ये निवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

वॉर्डन
मुलांचे वसतीगृह,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

वॉर्डन 26.6.18
मुलींचे वसतीगृह,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

टिप :-

१) वसतीगृहातील प्रवेश हा विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला संलग्नीत असतो. सत्र २०१८ १९ ला पद.शैक्षणिक विभागाचे प्रवेश विविध पध्दतीने विभागावेस्तरावर होत असल्यामुळे सदर प्रवेश प्रक्रियेत बदल झाल्यास किंवा प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रिकेत बदल झाल्यास सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विचारात घेऊन वसतीगृह प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल व त्याबाबत सूचना वसतीगृह कार्यालयामध्ये लावण्यात येईल.

२) प्रवेशाचे वेळी विद्यार्थीनीचे स्वतः पालक व त्यांएचे छायाचित्र असलेल्या ओळखपत्रासह उपस्थित असने अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश निश्चित करता येणार नाही याची विद्यार्थीनींनी नोंद घ्यावी.

**३) ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना Transfer Round ला हजर राहावयाचे आहे अशा विद्यार्थी/विद्यार्थीनींनी सदर फेरी (Round ) नंतर वसतीगृह प्रवेश अर्ज सादर करावा. चुकीचा विभागामध्ये प्रवेश अर्ज सादर केल्यास प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.**